सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



तरुण भारत सोलापूर
https://epaper.dainiktarunbharat.com/

## संक्षिप्त वृत्त

### पिलीवमध्ये एकाच रात्री चार घरफोड्या; रोख रक्कम, सोने-चांदीचे दागिने लंपास

**पिलीव, दि. ८ डिसेंबर-**

माळशिरस तालुक्यातील पिलीव येथे ७ डिसेंबर रोजी रात्री बारा ते पहाटे तीन वाजण्याच्या सुमारास चार ठिकाणी अज्ञात चोरट्यांनी बंद दरवाजाची कुलुपे तोडून घरात प्रवेश करुन कपाटात ठेवलेली रोख रक्कम, सोन्या-चांदीचे दागिने व इतर मौल्यवान किंमती वस्तूंची चोरी केल्याचे उघडकीस आले आहे. यामध्ये हनुमान तालमीजवळील राहणारे रघुनाथ देवकर यांच्या घरातील कपाटातील सोन्या-चांदीचे पंचवीस, तीस हजारांचे दागिने, राजेंद्र कस्तुरे यांच्या घरातील कॅमेरा, चांदीच्या ट्रॉफी, विलासराव माने यांच्या घरातील कपाटाची मोडतोड करीत एलईडी टीव्ही चोरुन नेला. मुख्य पेठेतील हॉटेल चालक मनोहर माळी यांच्या कपाटातील रोख रक्कम अज्ञात चोरट्यांनी चोरुन नेली आहे. या घटनेची माहिती समजताच पिलीव पोलीस स्टेशनचे हवालदार धनाजी झगडे व दत्तात्रय खरात यांनी सर्व घटनास्थळी जाऊन रितसर पंचनामा केला आहे. या चोरीच्या घटनेचा अधिक तपास माळशिरस पोलीस स्टेशनचे पोलिस निरीक्षक नारायण पवार यांच्या मार्गदशनाखाली हवालदार धनाजी झगडे हे करीत आहेत.





### नातेपुते येथील काजल लांडगे यांची लघु टंकलेखकपदी निवड

**नातेपुते, दि. ८ डिसेंबर-**

नातेपुते, साठेनगर (ता. माळशिरस) येथील काजल शामराव लांडगे यांची सहकार आयुक्त व निबंधक कार्यालय नाशिक या ठिकाणी लघु टंकलेखकपदी निवड झाल्याबद्दल शिवसेना (शिंदे गट) माळशिरस तालुका प्रमुख सतीश सपकाळ यांच्याकडून सत्कार करण्यात आला. यावेळी काजल लांडगे यांच्या आई-वडिलांसह शिवसैनिक, कार्यकर्ते उपस्थित होते. काजलचे वडील बांधकाम कामगार असून आई गृहिणी आहेत. अतिशय गरीब परिस्थितीतून शिक्षण घेऊन काजलने आई वडिलांचे स्वप्न पूर्ण केले.

### जिल्हा सत्र न्यायालयाच्या वरिष्ठ लिपिकपदी मल्लिकार्जुन बिराजदार

**अक्कलकोट दि.८ डिसेंबर**



तालुक्यातील बोरी उमरगे येथील एका गरीब कुटुंबात जन्मलेल्या उमेश मल्लिकार्जुन बिराजदार यांची सोलापूर जिल्हा सत्र न्यायालयात वरिष्ठ लिपीक या पदावर नियुक्ती करण्यात आल्याने ग्रामस्थांनी जल्लोषात स्वागत केले. मल्लिकार्जुन बिराजदार हे अत्यंत गरिबी परिस्थितीतून नवी मुंबई येथील भाजी मंडईमध्ये मिळेल ते काम करून उमेश व महेश या दोन्ही मुलांना उच्च शिक्षण दिले. एक मुलगा अक्कलकोट पोष्ट खात्यात कार्यरत असून आत्ता उमेश हे जिल्हा सत्र न्यायालयात वरिष्ठ लिपीक या पदावर नियुक्त झाले आहेत.


# साखरेची आधारभूत किंमत ४,२०० रुपये करा

## खा. धनंजय महाडिक यांची संसदेच्या अधिवेशनात मागणी

**तभा वृत्तसेवा,**
**मोहोळ, दि. ८ डिसेंबर-**

साखरेची आधारभूत किंमत वाढवून ती ४२०० रुपये करावी अशी मागणी भाजपाचे राज्यसभेचे खासदार धनंजय महाडिक यांनी अधिवेशनात केली.

खा. धनंजय महाडिक यांनी संसदेच्या हिवाळी अधिवेशनात साखरेच्या एम एसपीबद्दल मुद्दा उपस्थित केला. २०१९ पासून साखरेची किमान आधारभूत किंमत ३ हजार १०० रुपये प्रतिक्विंटल आहे. एकीकडे शासनाकडून दरवर्षी उसाची एफआरपी वाढवली जाते तर दुसरीकडे साखरेचा उत्पादन खर्च, कर्मचारी पगार, कर्जाचे व्याज यामुळे साखर कारखान्यांवरील आर्थिक बोजा वाढत चालला आहे. परिणामी साखरेच्या किमान आधारभूत किंमीतीमध्ये ४,२०० रुपये प्रतिक्विंटल इतकी वाढ करावी, अशी मागणी खासदार महाडिक यांनी केली. खासदार महाडिक यांनी राज्यसभेत देशातील साखर कारखान्यांसमोरील प्रश्नांची मांडणी केली. ऊस उत्पादक शेतकऱ्यांना देण्यासाठी एफआरपीची रक्कम दरवर्षी वाढते पण साखरेची एमएसपी वाढत नाही. त्यामुळे साखर उद्योग अडचणीत आला आहे. याकडे त्यांनी केंद्र सरकारचे लक्ष वेधले. भारत हा जगातील सर्वात मोठा साखर उत्पादक देश आहे. भारतीय अर्थव्यवस्थेत देशातील हा उद्योग महत्त्वाची भूमिका बजावतो. देशातील १० कोटींपेक्षा अधिक ऊस उत्पादकांच्या कुटुंबांसाठी साखर उद्योग उदरनिर्वाहाचे साधन आहे. संपूर्ण देशात सुमारे ५५० साखर कारखाने असून या उद्योगातून सुमारे साडेपाच लाख लोकांना रोजगार उपलब्ध होतो. देशात दरवर्षी सुमारे ३६० ते ४०० लाख मे. टन साखरेचे उत्पादन होते. २०२२-२३ या वर्षात सुमारे ७० लाख मे. टन साखर निर्यात केली. तर देशांतर्गत साखरेचा वापर सुमारे २६० लाख मे. टन आहे. ऊस पिकाचे एकूण मूल्य ८० हजार कोटी रुपयांपेक्षा जास्त आहे. परंतु हा संपूर्ण उद्योग वेळोवेळी होणाऱ्या हवामान बदलावर अवलंबून असतो. त्यातून उद्योगाचे अनेकदा नुकसान होते. एकीकडे केंद्र सरकारने उसाची किंमत निश्चित केली आहे. एफआरपीमुळे शेतकऱ्यांचा फायदा होत आहे. त्याचप्रमाणे केंद्र सरकारने साखरेसाठी एमएसपी म्हणजे किमान हमीभाव ३,१०० रुपये प्रतिक्विंटल ठरवला; परंतु सात वर्षांपासून एमएसपी दरात वाढ नाही.





### खर्च भागविणे कारखान्यांना अशक्य

साखरेचा उत्पादन खर्च, तोडणी, वाहतूक, कारखान्याची देखभाल, कर्मचारी पगार, व्याज असे अनेक खर्च साखर कारखान्यांना करावे लागतात. ३,१०० रुपयांच्या एमएसपीमध्ये हा सर्व खर्च भागविणे कारखान्यांना शक्य नाही. त्यामुळे केंद्र सरकारने साखरेच्या एमएसपीमध्ये ४,२०० रुपयांपर्यंत वाढ करावी, अशी मागणी इस्मा, नॅशनल शुगर फेडरेशन व महाराष्ट्र साखर संघाने केली आहे. त्यातून शेतकऱ्यांना दोन पैसे जादा मिळतील व तोट्यात असलेल्या कारखान्यांना उभारी मिळेल, असा विश्वास खा. महाडिकांनी व्यक्त केला.

## सिद्धरामेश्वरांच्या नंदीध्वजांच्या पूजेची लगबग

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ८ डिसेंबर-**

ग्रामदैवत शिवयोगी सिद्धरामेश्वर यात्रेतील योगदंडाचे प्रतीक असलेले नंदीध्वज पेलण्याचा सराव शहरात सुरु असून बोला ...बोला एकदा भक्तलिंग हर्र बोला हर्र, श्री सिद्धारामेश्वर महाराज की जय अशा घोषणा देत भक्तिमय, आनंददायी आणि मंगलमयी वातावरणात शेकडो भाविकांच्या उपस्थितीत तिसऱ्या नंदीध्वजांचे पूजन शेळगी येथील श्री रामराज्य नगर येथे मोठ्या भक्तिभावाने करण्यात आले.

ग्रामदैवत सिद्धरामेश्वर यात्रेतील तिसरे नंदीध्वजाचे पूजन नागनाथ दिलीप बडुरे दाम्पत्य यांच्या हस्ते पूजन करण्यात आले. नंदीध्वजाला आकर्षक पद्धतीने सजविण्यात आले होते. यावेळी नंदीध्वजांचे विधिवत पूजन करून महाआरती करण्यात आली. केदार स्वामी आणि मल्लिनाथ कंदलगावकर यांनी मंत्रोच्चाराचे पठण केले. यात्रेच्या अगोदर आपल्या घरी नंदीध्वज पूजनासाठी यावेत अशी अनेक भक्तांची इच्छा असते. सोलापूर शहर परिसरात हे नंदीध्वज पूजनासाठी घेऊन जातानाचे चित्र सर्वत्र दिसून येत आहे. यावेळी तिसऱ्या नंदीध्वजांचे मास्तर रेवणसिद्ध माळी, प्रभाकर हेबळे, शिवानंद भिमदे, गंगाधर कुडल, श्रीकांत माळी, कैलास माळी, मल्लिनाथ माळी, रितेश सवळी, योगेश चिंचोळी, योगीराज भिमदे, प्रसाद भिमदे उपस्थित होते.



> श्री सिद्धरामेश्वरांची यात्रा ही आनंदाची पर्वणी असते. यंदा आम्ही नंदीध्वजाला बारा ज्योतिर्लिंगाच्या फुलांची आरास केली होती. नंदीध्वज पूजन करताना मनोमन आनंद होते.
>
> **-विश्वनाथ बडुरे, नंदीध्वज पूजक**

## मंगळवेढ्यात दुचाकीवर संस्टबाजी करणाऱ्या युवकावर गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा,**
**मंगळवेढा, दि. ८ डिसेंबर-**

मंगळवेढा शहरात एका मोटर सायकल स्वाराकडे वाहन चालविण्याचा परवाना नसतानाही लोकांच्या जिवीतास धोका निर्माण होईल अशा पध्दतीने वाहन चालविताना निर्भया पथकाला मिळून आल्याने खंडू तानाजी शिंदे (वय २६, रा. बठाण) याच्या विरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

फिर्यादी तथा निर्भया पथकातील पोलीस कर्मचारी अमोल राऊत, पोलीस उपनिरीक्षक स्नेहल चव्हाण, महिला पोलीस अंमलदार कविता सावंत,सोनाली जुंदळे,प्रविण जाधव आदी पथक डी.वाय.एस.पी. विक्रांत गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली कारवाई करत असताना ५ डिसेंबर रोजी १०.५० वाजता मंगळवेढा शहरातील नागणेवाडीकडे जाणार्या रोडवर यातील आरोपी खंडू तानाजी शिंदे हा (क्र. एम. एच. १३/ सी. एन. ०७९०) या मोटरसायकलवर बसून ती हायगयीने, अविचाराने लोकांच्या जीवीतास धोका निर्माण होईल असे चालविताना निर्भया पथकाला मिळून आल्याने त्याच्याविरुध्द पोलीस अंमलदार राऊत यांनी गुन्हा दाखल केला आहे. सदर चालकाकडे लायसन्सबाबत विचारणा केली असता वाहन चालविण्याचा कुठलाही परवाना नसल्याचे निदर्शनास आले. दरम्यान याचा अधिक तपास शहर बीटच्या महिला पोलीस हवालदार सुनिता चवरे ह्या करीत आहेत.

# अमेरिकेचे उद्योजक आले सोलापुरात

## विमानसेवा २३ डिसेंबरपासून, तिकीट विक्री आजपासून

**त. भा. वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ८ डिसेंबर -**

येत्या २३ डिसेंबर रोजी सोलापुरातील होटगी रोड विमानतळावरील सेवा सुरू होत आहे तर या विमान सेवेच्या तिकिटाचे बुकिंग उद्यापासून सुरु होत आहे. दरम्यान, ही विमानसेवा सुरु झाल्याने आता चक्क अमेरिकेतील उद्योजक व जमीन खरेदीदार आताच सोलापुरात येऊ लागले आहेत.

याबाबतचे अधिक वृत्त असे की, सोलापूरच्या होटगीरोड विमानतळाच्या उद्घाटनाने उद्योगाची वाढ आणि आर्थिक विकासाला चालना मिळणार आहे. मागील सहा महिन्यांपासून अमेरिकेतील मियामी शहरातील दोन प्रसिद्ध उद्योजक, अल्बर्ट आणि ब्रँडोन, सोलापूरला येण्याची योजना करत होते. त्यांचा मुख्य उद्देश चिंचोळी एमआयडीसीमधील बंग डाटा कंपनीशी व्यावसायिक संबंध प्रस्थापित करणे हा होता. आज, या दोन्ही उद्योजकांनी मुंबईला उतरून एका खासगी चार्टर विमानाने सोलापूरला प्रवास केला. त्यांनी बंग डाटाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांसोबत सविस्तर बैठक घेतली आणि भविष्यातील सहकार्यासाठी महत्त्वपूर्ण निर्णय घेतले. दिवसभर चाललेल्या या बैठकीत दोन्ही कंपन्यांमधील व्यावसायिक संबंधांना नवीन उंची गाठण्यासाठी मार्गदर्शक तत्त्वे ठरवण्यात आली.



बंग डाटाचे संस्थापक वासुदेव बंग यांनी या यशस्वी भेटीबद्दल आपल्या विकास मंचाच्या सर्व सदस्यांचे आभार मानले. त्यांनी सांगितले की, तुमच्या सतत प्रयत्नांमुळेच सोलापूरला अशा उच्च दर्जाचे उद्योजक आकर्षित होऊ शकले आहेत. यामुळे सोलापूरचा उद्योग क्षेत्र आंतरराष्ट्रीय पातळीवर पोहोचण्याची दिशा घेईल.

सोलापूरचे विमानतळ सुरू झाल्याने शहराच्या आर्थिक विकासाला मोठी चालना मिळाली आहे. आता सोलापूरला जगभरातून गुंतवणूकदार आकर्षित होण्याची शक्यता आहे. हे जे घडले आहे ते पंधरा वर्षांपूर्वी घडले असते तर सोलापूरचा विकास आणखी वेगाने झाला असता.

## दिंडीत दोघा भाविकांना कारने ठोकरले

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ८ डिसेंबर-**

१४ डिसेंबर रोजी असलेल्या श्रीदत्त जयंती निमित् करकंब कडून गाणगापूरकडे निघालेल्या दिंडीतील दोघा भाविकांना अज्ञात कारने ठोकरले.ही घटना रविवारी पहाटे साडेपाच वाजणाच्या सुमारास घडली.या घटनेची हकीकत अशी की,प्रकाश पांडुरंग जवंजाळ (वय-५५) व अण्णा धोंडीबा कारंडे (वय-४८ दोघे रा. चिखली तालुका मोहोळ) हे दरवर्षी या दिंडीत सहभागी होऊन गांणगापुरला जात असतात.रात्री सावळेश्वर येथे मुक्काम करून पहाटे हे दिंडी गाणगापूर कडे मार्गस्थ झाली होती.दिंडी थोडी पुढे गेली होती. आणि हे दोघे भाविक पाठीमागून निघाले असताना ही घटना घडली. उपचाराकरीता त्या दोघांना शासकीय रुग्णालयात दाखल केले आहे.दोघांचे पाय फ्रॅक्चर झाल्याची त्यांची नातेवाईकांनी सांगितले.या घटनेची नोंद सिव्हिल पोलीस चौकीत झाली आहे.

**Hon. Balasaheb Thackeray Agribusiness and Rural Transformation (SMART) Project**

**E-TENDER NOTICE NO :2024_DOAWB_1122165**

**Supply, Installation, Fabrication, Commissioning and Testing of 4 TPH Fully Automatic Rice Mill Machinery**

The Government of Maharashtra is implementing the World Bank-funded SMART Project. **Chintamani Farmer Producer Company Limited, Bhendala,Tah- Paoni, Dist- Bhandara** is one of the beneficiaries under the project and inviting online bids on **https://mahatenders.gov.in** for above mentioned project. The bid document is also available on the project website **www.smart-mh.org**, in tender and procurement section. The last date for submission of online bid is **28/12/2024 up to 4.00 PM.** Any updates or notices shall be published on aforementioned websites only.

**District Implementation Unit, SMART Project, Dist.: Bhandara**

MVOP.No. 19/2023

**IN THE COURT OF THE 2nd ADDITIONAL DISTRICT JUDGE CUM MOTOR VEHICLE TRIBUNAL KURNOOL AT ADOHI**

Between:-
**Bolekar Shyamala & others - Petitioners**
Vs
**Sunil Vijay Kumar & others - RESPONDENTS**

R-1) Sunil Vijay Kumar, driver, Swagat Nagar, Sholapur.

Take notice that the above motor vehicle o.p is filed claiming compensation due to the Motor vehicle accident that took place on 16-01-2013. resulting the death of Umesh Bolekar Chidanand. You are hereby directed to appear in person or through pleader on 12-12-2024 at 10-30 AM. failing which you will be set exparte

**Sd/-**
**GV Desai**
**Advocate or pentoners**

## जिल्हाधिकारी कार्यालय, सोलापूर

### (सामान्य प्रशासन शाखा)

**जिल्हाधिकारी कार्यालय, सात रस्ता, विजापूर रोड,**
**सोलापूर-४१३ ००१. दूरध्वनी क्र. ०२१७-२७३१०२०**
**Email ID:-tahsildargadsolapur@gmail.com**

**क्र.२०२४/साशा/संकिर्ण-१ब/आरआर/८५३/२०२४** **दिनांक : ०५/१२/२०२४**

### ई-निविदा सुचना

जिल्हाधिकारी सोलापूर हे जिल्हाधिकारी कार्यालय, शासकीय दूध डेअरी शेजारी, विजापूर रस्ता, सात रस्ता सोलापूर येथील कार्यालयातील तळमजल्यावरील वाणिज्य आस्थापना (उपहार गृह) क्षेत्र १८५.२३ चौ.मी मासिक परवाना शुल्क रु.३५,१२३/- (अक्षरी पस्तीस हजार एकशे तेवीस रूपये फक्त) (फि वर) संमती आणि परवानगी करार (लिव्ह ॲन्ड लायसन्स) पध्दतीने चालविण्यासाठी ई-निविदा मागवित आहेत.

सदर निविदा भरणे, सादर करणे व स्विकारणे हे खालील वेळापत्रकाप्रमाणे राहिल.

| अ.क्र. | टप्पा | दिनांक | दिनांक |
|---|---|---|---|
| १. | ई-निविदा सादर करण्याचा कालावधी | दि. ०९/१२/२०२४ | दि.२०/१२/२०२४ |
| २. | Prebid मिटींग | दि. १३/१२/२०२४ दुपारी १२ वाजता | |
| ३. | निविदा सादर करण्याचा अंतिम दि. व वेळ | दि.२०/१२/२०२४ सायं. ५ वाजेपर्यंत | |
| ४. | ई निविदा उघडण्याचे ठिकाण व दिनांक वेळ | जिल्हाधिकारी कार्यालय, सोलापूर दि.२३/१२/२०२४ दुपारी ४ वाजता | |

सदर ई-निविदेस पुरेसा प्रतिसाद मिळाला नसल्यास निविदा सादर करणेस निविदेच्या नियमानुसार मुदतवाढ देण्यात येईल. निविदा उघडतेवेळी निविदाधारकास उपस्थित राहण्यास परवानगी आहे.

कोणतेही कारण न देता कोणतीही निविदा स्विकारण्याचे वा नाकारण्याचे अधिकार जिल्हाधिकारी सोलापूर यांचेकडे राखून ठेवले आहेत, याची कृपया नोंद घ्यावी.

**निविदासोबत सादर करावयाची कागदपत्रे :-**

१. सदर उपहारगृह चालकास पुर्वानुभव असलेबाबतचा दाखला
२. मुंबई दुकान व संस्था अधिनियम, १९४८ अंतर्गत शॉप ॲक्ट अंतर्गत नोंदणीकृत प्रमाणपत्र, अन्न व औषध प्रशासन विभागाकडील खाद्य पदार्थ बनविण्याचा / पुरविण्याचा वैध परवाना, जीएसटी नोंदणी प्रमाणपत्र.
३. निविदाधारक केंद्र शासन / राज्य शासन / स्थानिक प्राधिकरणाद्वारे काळीसुचीबध्द किंवा बहिष्कृत केलेला नसला पाहीजे. त्यासंबंधी स्वंयघोषणापत्र.
४. निविदाधारक यांनी पोलीस विभागाकडील चारित्र्य पडताळणी दाखला सादर करणे आवश्यक राहील.
५. मागील तीन वर्षाचे आयकर विवरणपत्र.
६. उपहारगृहासाठीच्या खाद्यपदार्थांचे व्यावसायिक (आर्थिक) दरपत्रक.
७. पॅन (PAN) व आधारकार्ड.
८. शासकीय / निमशासकीय / महामंडळे / इतर शासकीय संस्था / खाजगी उद्योग / व्यापार यांना किमान ३ वर्षे सेवा पुरविल्याचा अनुभवाचे दस्तऐवज / दाखला / प्रमाणपत्र.
९. सुरक्षा बयाणा ठेव कमीत कमी रु.५०,०००/- (अक्षरी पन्नास हजार फक्त) राहील. यापुढे १०% च्या पटीत जास्त रक्कम भरणा-या निविदाधारकाचा प्राधान्यक्रमानुसार विचार करण्यात येईल. सदर रक्कम Tahsildar (General) Collectorate Solapur यांचे नावे राष्ट्रीयकृत बँकेचा धनाकर्ष किंवा ईसीएस/आरटीजीएस द्वारा Bank Name: State Bank of India, Treasury Branch Solapur, Account Number:- IFSC Code :- SBIN0003072 वर जमा करावी.
१०. निविदा फॉर्मची किंमत रु.३,०००/- (अक्षरी तीन हजार रूपये फक्त) आहे. निविदा फॉर्मच्या किंमतीवर नियमानुसार वस्तु व सेवाकर भरावा लागेल.

**निविदासंदर्भात नियम, अटी व शर्ती :-**

१. सर्व पात्र इच्छुक निविदाकारांनी निविदा डाऊनलोड करण्यासाठी व निविदा प्रक्रियेत भाग घेण्यासाठी निविदा प्रणालीच्या http://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर Enrolled करणे आवश्यक आहे.
२. निविदा फॉर्मची रक्कम ही ऑनलाईन गेटवे पध्दतीने भरावयाचे आहे. अन्यथा निविदा उघडण्यात येणार नाही, याची नोंद घ्यावी. तसेच तांत्रिक निविदा सादर करताना केवळ तांत्रिक निविदेशी (फॉर्म-अ सोबत) संबंधित कागदपत्रेच अपलोड करण्यात यावीत आणि कोणत्याही परिस्थितीत तांत्रिक निविदेच्या पाकिटामध्ये निविदाकाराने आर्थिक निविदा सादर करावयाची नाही. अन्यथा निविदा रद्द ठरविण्यात येईल.
३. निविदा फॉर्म अ पूर्णतः भरुन त्यावर फोटो लावून, स्वाक्षरी करुन, फॉर्म स्कॅन करुन अपलोड करावा तसेच फॉर्म ब क ड ई भरुन व त्यासोबत वरीलप्रमाणे कागदपत्रे स्कॅन करुन जोडावीत. निविदा कोणत्याही बाबतीत पूर्णपणे भरली नसल्यास किंवा त्यामध्ये खाडाखोड आढळल्यास व फॉर्म अ मध्ये निविदाकाराची सही नसल्यास, फोटो लावला नसल्यास ग्राहय धरली जाणार नाही.
४. वाणिज्य आस्थापनेचा कराराचा कालावधी ५ वर्षासाठी राहील व दरवर्षी १०% इतक्या रकमेची वाढ करण्यात येईल.
५. शासकीय / निमशासकीय महामंडळ तसेच खाजगी कंपनीतील कायमस्वरुपी नोकरीत असलेल्या कर्मचारी यांना निविदा भरता येणार नाही.
६. वरील जागेत वाणिज्य आस्थापना आहे, त्या स्थितीत देणेत आहे. निवड झालेल्या निविदाकाराने / संस्थेने सदर आस्थापनेची टेबल, खुर्च्या, किचन कट्टा, रंगरंगोटी व इतर दुरुस्ती असल्यास आपणास त्याची परवानगी या कार्यालयाकडून घेणे आवश्यक आहे. मा. जिल्हाधिकारी यांना अपेक्षित असलेल्या रकमेमध्ये सदर किरकोळ बांधकाम ाचा व इतर दुरुस्त्यांचा खर्च समाविष्ट नाही. तसेच उपहारगृह तसेच उपहारगृहालगतचा परिसर स्वच्छ ठेवण्याची जबाबदारी संबधित उपहारगृह चालकाची राहील.
७. इकडील कार्यालयाकडून उपहारगृह चालकास फक्त वापरासाठीचे पाणी उपलब्ध होईल.
८. सदर उपहारगृहास येणारे विद्युत देयक उपहारगृह चालकास भरावे लागेल.
९. उपहारगृहामधून चहा, कॉफी, नाष्टा (पोहे, उप्पीट, शिरा, इडली, वडा, डोसा) जेवणामध्ये पुलाव, जिरा राईस, राईस प्लेट, पुरी भाजी, वडापाव, भजी, आईस्क्रीम, थंडपेय इ. विक्री करता येईल.
१०. सदर निविदेमध्ये नमुद केलेप्रमाणे क्षेत्रफळा इतकीच जागा वापरणे बंधनकारक राहील.
११. निविदा छाननी अंती मा. जिल्हाधिकारी हे पात्र निविदाकारांची समक्ष मुलाखत घेतील. या मुलाखतीत त्या निविदाकारांनी उपस्थित राहणे बंधनकारक राहील.
१२. निविदा कोणत्याही बाबतीत अपूर्ण भरलेल्या किंवा खाडाखोड असलेल्या निविदाकारांची सही नसल्यास, फोटो जोडलेला नसल्यास तसेच निविदेवर सचिव व अध्यक्षांची सही नसलेस निविदा कुठल्याही परिस्थितीत ग्राहय धरल्या जाणार नाहीत.
१३. उपहारगृह चालकाने उपहारगृहात VIP तसेच अधिकारी, महिलांसाठी, अभ्यागतांसाठी तसेच कर्मचारी यांचेसाठी असे ४ पार्टीशन करणे आवश्यक आहे. सदरचा खर्च हा उपहारगृह चालकाचा राहील.
१४. थकबाकी, न्यायालयीन प्रकरणे तसेच गंभीर तक्रारी असलेल्या आस्थापनांकरिता निविदा प्रक्रियेत भाग घेता येणार नाही किंवा त्यांच्या निविदा स्विकारल्या जाणार नाहीत.
१५. उपहारगृह चालकाबाबत काही तक्रार आल्यास सदरची तक्रार योग्य असल्याचे निर्दशनास आल्यास सदर उपहागृह चालकाचा करार संपविण्याचा अधिकार अध्यक्ष उपहारगृह समिती यांना राहील.
१६. सदरचे ई निवीदा सोबत निवीदाकाराने संबंधित सर्व कागदपत्रे अपलोड करणे आवश्यक आहे.
१७. पुरविलेल्या माहितीची तपासणी / सत्यापन करताना सादर करण्यात आलेली माहिती खोटी असल्याचे सिध्द झाल्यास तसेच दरपत्रक दस्तऐवजमध्ये नमूद अटी आणि नियमांचे पालन करण्यात आले नाही तर बयाण रक्कम अनामत रक्कम जप्त करण्यात येईल आणि तीन (३) वर्षे कालावधीकरिता सदर निवीदाधारकास काळ्या यादीत समाविष्ठ करण्यात येईल.

जिल्हाधिकारी कार्यालय सोलापूर येथील उपहारगृहासाठी खालीलप्रमाणे समिती नियुक्त करण्यात आलेली असून सदर समितीचा निर्णय अंतिम राहील.

| अ.क्र. | अधिकाऱ्यांचे पदनाम टप्पा | समितीतील पद |
|---|---|---|
| १. | निवासी उपजिल्हाधिकारी | अध्यक्ष |
| २. | लेखाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय सोलापूर | सदस्य |
| ३. | अन्न व औषध प्रशासन विभागाचा प्रतिनिधी | सदस्य |
| ४. | जिल्हा उद्योग केंद्र यांचेकडील प्रतिनिधी | सदस्य |
| ५ | सार्वजनिक बांधकाम विभाग सोलापूर यांचेकडील एक प्रतिनिधी | सदस्य |
| ६ | तहसिलदार सर्वसाधारण | सदस्य सचिव |

**सही/-**
**कुमार आशिर्वाद** (भा.प्र.से.)
**जिल्हाधिकारी, सोलापूर**